महाराष्ट्र पोलीस
नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 17/10/2020 (शनिवार)
(सायंकाळ)

---

## कळमेश्वर अंतर्गत खैरी(लखमाजी) येथील गांजा तस्कर (अमली पदार्थ ) विक्री करणा–यास 5 किलो 300ग्रॅम गांजा (अमली पदार्थासह)

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांनी केला गजाआड

स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण चे पथक दिनांक 17/10/2020 रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर नागपूर ग्रामीण अंतर्गत पेट्रोलींग करीत असता पथकास गोपनिय माहिती मिळाली की, खैरी (लखमाजी) या गावाती नारायण महादेव शेंडे, वय 43 वर्ष या नावाचा इसम त्याच्या राहत्या घरी गांजा (अमली पदाथ) साठवणूक तसेच विक्री करतो सदर माहितीची शहानिशी करुन खात्री झाल्याने सदर खैरी या गावी जावून नारायण शेंडे यांच्या घराची घरझडती घेतली असता नारायण शेंडे यांच्या राहत्या घरी त्याच्या ताब्यातून ऐकूण 5 किलो 300 ग्रॅम गांजा (अमली पदार्थ) रु. 53,630/– तसेच इतर साहित्य ज्यात (वजन काटा, मोबाईल ) कि. रु.1500/– असे एकूण रु. 55,130/– किमतीचा मुद्येमाल हस्तगत करण्यात आला. बाबत पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे एन.डी.पी.एस.कायदया कलम 20,22 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास पोस्टे कळमेश्वर करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, मा. श्री. राहुल माकणीकर, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात श्री. अनिल जिटटावार पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सपोनि जितेंद्र वैरागडे, पोउपनि नरेंद्र गौरखेडे, सपोउपनि/जय शर्मा, पोहवा/महेश जाधव, गंजेद्र चौधरी, नापोशि/सत्यशिल कोठारे, पोशि/रोहन डाखोरे, महेश बिसने, बालाजी साखरे, चालक पोहवा/भारुराव खंडाते चापोना/अमोल कुथे सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण तसेच पोस्टे कळमेश्वर येथील मनोज खडसे, पोशि/निलेश उईके यांनी संयुक्तरित्या पार पाडली.



## जबरी संभोग

पो.स्टे. कन्हान :– दिनांक 16/10/2020 चे 12.00 वा. 13.00 वा. सुमारास फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी/पीडित वय 12 वर्ष व मुलगा हे दि. 16/10/2020 रोजी 11.30 वा. ते 12.00 वा. दरम्यान बकऱ्या चारण्याकरीता गेले होते. त्यादरम्यान आरोपी नामे– मनीष रविंद्र चौधरी, वय 25 वर्ष, रा. नीलज (खंडाळा) याने 1,000/–रूपये देतो असे आमीष दाखवुन बळजबरीने पीडितेला कापसाच्या पराटीच्या शेतात घेवुन जावुन पिडीतेसोबत बळजबरीने जबरी संभोग केला. तसेच आरोपीने पीडितेला ''सदरची बाब घरी कोणालाही सांगीतल्यास तुझ्या परीवाराला जिवाने मारून टाकील'' अशी धमकी दिली. पीडितेची आई फिर्यादी या आरोपीला जाब वीचारण्याकरीता त्याच्या घरासमोर गेले असता आरोपीने फिर्यादी सोबत वाद करून शिवीगाळ करून लाथाबुक्कीने मारहाण केली. फिर्यादी हि तिचे मुलीला घरी घेवुन आल्यावर सवीस्तर वीचारले असता तीने सांगीतले की, ''यापुर्वी आरोपी याने पैसे देतो असे सांगुन जबरदस्तीने शेतात नेवुन एप्रील 2020 महीण्यात सुध्दा बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापीत केले होते.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 376(3),376(2)(एन),323,504,506 भादंवि. सहकलम 4 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मलकुवार पो. स्टे खापरखेडा 9623687627 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर